# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

**मंगळवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९/फाल्गुन ७, १९४० (शके)**

**१४. सन २०१९-२०२० च्या अंतरिम अर्थसंकल्पीय प्रकाशनांचे सुटकेससह वितरण**

विधानसभेच्या सर्व सन्मा.सदस्यांना कळविण्यात येते की, सन २०१९-२०२० ची अर्थसंकल्पीय प्रकाशने असलेल्या सुटकेसची टोकन्स **मा.सदस्यांना बुधवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी हजेरीपटावर स्वाक्षरी करताना व गुरुवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजीपासून सत्र संपेपर्यंत "ड-३" (अंदाज समिती), कक्ष क्र.१२०२, बारावा मजला, विधान भवन, मुंबई** येथे देण्यात येतील. सन्मा.सदस्यांनी सदर टोकन्स खालील वितरण केंद्रावर जमा केल्यानंतर अर्थसंकल्पीय प्रकाशने असलेली सुटकेस त्यांना वितरीत करण्यात येईल.

| अ.क. (१) | वार व दिनांक (२) | अर्थसंकल्पीय प्रकाशने असलेली सुटकेस वितरणाचा कालावधी (३) | ठिकाण (४) |
|---|---|---|---|
| १. | बुधवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९ | अर्थसंकल्पावरील मा.वित्त मंत्री यांचे भाषण संपल्यानंतर | विधान भवनाच्या मागील प्रवेशद्वाराच्या बाजूला, विधान भवन, मुंबई. |
| २. | गुरुवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ पासून सत्र संपेपर्यंत | सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत | मध्यवर्ती सभागृहालगतचा कक्ष क्रमांक ४ (ए) (चौथा मजला), गोल इमारत, विधान भवन, मुंबई. |

सर्व सन्मा.सदस्यांना कळविण्यांत येते की, अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर अर्थसंकल्पीय प्रकाशने असलेल्या सुटकेसेस त्यांनी कृपया लवकरात लवकर प्राप्त करुन घ्याव्यात.

मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांच्या खाजगी सचिवांनी उपरोक्त टोकन्स तसेच अर्थसंकल्पीय प्रकाशने असलेली सुटकेस नेण्याची व्यवस्था करावी.

---

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०१९

**जितेंद्र भोळे**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्मा.सदस्य ( मंत्री महोदयांसह )
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.